फेब्रुवारी–मार्च २०१२ – किंमत एक रुपया

एकमेकां सहाय करू ! अवघे धरू सुपंथ !!

# सेवा दीप

रोहिदास समाज पंचायत संघाचे मुखपत्र



नियोजित

**संत रोहिदास भवन**

# विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास वाढवला पाहिजे

डॉ. छाया शिंदे

रोहिदास समाज पंचायत संघ, मुंबई, शिक्षण समिती आयोजित विद्यार्थी कौतुक व पारितोषिक वितरण सोहळा, शनिवार दिनांक २८ जानेवारी २०१२, रोजी पिपल्स जिमखाना, लाल मैदान, परळ, मुंबई येथे, समारंभाचे अध्यक्ष मा. **श्री. भागुराम कदम,** प्रमुख अतिथि मा. **डॉ. छाया अशोक शिंदे** (नेत्र विभाग प्रमुख–लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालय) व मा. **श्री. प्रकाश सावंत** (वरिष्ठ पत्रकार नवशक्ति) यांच्या उपस्थित सपंन्न झाला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना **डॉ. छाया शिंदे** यांनी सांगितले की, आताचे दिवस बदलेले आहेत. पूर्वी डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हायचे, पण आता वेगवेगळया शिक्षणाची दालने निर्माण झाली आहेत. आपल्या पसंतीच्या करिअर कडे आपण जाऊ शकतो. त्यासाठी आपल्याकडे आत्मविश्वास पाहिजे.

आपला आत्मविश्वास विद्यार्थ्यांनी वाढविला पाहिजे. त्या पुढे म्हणाल्या जे विद्यार्थी क्लासेसला जाऊ शकत नाही ते Self Study पुस्तकाच्या आधारे अभ्यास करू शकतात. त्यासाठी आपण Time Table बनविले पाहिजे व त्या प्रमाणे अभ्यास करणे. पालकांच्या बाबतीत बोलायच तर त्यांचा यामध्ये फार मोठा वाटा असायला हवा. त्यांनी मुलांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांच्यावर अभ्यासाची जबरदस्ती करू नये. त्यांच्या



इ. १० वी मध्ये समाजात सर्व प्रथम आलेला कु. आदित्य प्रसाद गोवळकर यांचे पालक आई सौ. प्रज्ञा प्रसाद गोवळकर यांचा सत्कार करीत असताना, संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम छायाचित्रात डावीकडून सरचिटणीस श्री. रवि पेवेकर, प्रमुख अतिथी डॉ. छाया शिंदे, श्री. प्रकाश सावंत (पत्रकार) पाठीमागे शिक्षण समितीचे चिटणीस श्री. सुरेश जाळगावकर दिसत आहेत.

बरोबर बोलताना उत्साहि वातावरण तयार करा. Discipline is Important for students हे जो अमलात आणेल तो करिअर मध्ये यशस्वी होऊ शकतो.

डॉ. छाया शिंदे यांनी आपला सत्कार आज सर्वासमोर झाला यांचा त्यांना गौरव वाटला. त्यांचे वडील श्री. मधुकर शिरसोळकर हॉलमध्ये आल्यावर तर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

दुसरे प्रमुख अतिथी **श्री. प्रकाश सावंत** यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आपल्यामध्ये भक्कम असा आत्मविश्व पाहिजे, समोर ध्येय्य ठेवले पाहिजे, स्वतः शिस्त लावली पाहिजे, मी १७ प्रकाराच्या समाज संघटनामध्ये फिरलो आहे. परंतु रोहिदास समाज पंचायत संघाचा जेवढा पाया मजबूत आहे. अशी दुसरी संघटना नाही. म्हणून मी म्हणेन की, रोहिदास भवनासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजे.

संघ अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा. श्री. भागुराम कदम,** यांनी संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. नवीन वर्षाचा पहिला कार्यक्रम आहे त्या निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले की, पाल्यांने स्वतःची भूमिका स्वतः उठविली पाहिजे. पालक नाही म्हणून पाल्याने तक्रार करू नये.

IPS / IAS अशी पदे समाजा मध्ये भुषविली गेली पाहिजत. तेव्हाच कतृत्वाला सलाम केला जातो, कतृत्वाचा सन्मान केला जातो. बाबासाहेबानी म्हटले आहे

पान ५ वर

## ''भावपूर्ण श्रद्धांजली''

### श्रीमती धोंडीबाई तुकाराम कदम यांचे निधन

रोहिदास समाज पंचायत संघ, मुंबईचे अध्यक्ष श्री. भागुराम कदम यांच्या आजी **श्रीमती धोंडीबाई तुकाराम कदम** यांचे दिनांक ४ फेब्रुवारी २०१२ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो.


**सेवादीप**

वर्ष ३७ वे अंक ५ वा फेब्रुवारी–मार्च २०१२

संपादक
**श्री. रघुनाथ मा. घानकुटकर** (S.E.O.) (दलित मित्र)

मुद्रक व प्रकाशक
**श्री. भागुराम सोनू कदम** (अध्यक्ष)

व्यवस्थापक
**श्री. रवि विष्णू पेवेकर** (सरचिटणीस)

व्यवस्थापन–साहित्य समिती
**श्री. सुर्यकांत तुकाराम आंबेकर** (अध्यक्ष)
**श्री. रामदास महादेव आंबोकर**(हंगामी चिटणीस)

मुद्रण स्थळ : ड्रिम ग्राफिक्स, डोसा कंपाऊंड, के. के. मार्ग, मुंबई–४०० ०११

**कार्यालय व प्रकाशन स्थळ**
संत रोहिदास वसतिगृह, बी.डी.डी. चाळ क्र. २६ व २७ च्या मध्ये, मारुती मंदिर शेजारी, डिलाईल रोड, मुंबई–४०० ०१३,
**दूरध्वनी : २३०२०३४०**

रोहिदास समाज पंचायत संघाच्या मालकीचे पत्र मुद्रक व प्रकाशक संघाध्यक्ष श्री. भागुराम सोनू कदम यांनी रोहिदास समाज पंचायत संघासाठी प्रसिद्ध केले.


चर्मकार समाजाच्या सर्वांगिण उन्नतीकरिता महाराष्ट्र शासनाने ''संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची'' स्थापना केलेली आहे. सदर महामंडळाने चर्मकार समाजासाठी विविध योजना आखल्या आहेत. त्यांची माहिती क्रमशः सेवादीपमध्ये प्रसिद्ध करीत आहोत. गरजू समाज बंधू–भगिनींनी या योजनांचा लाभ घ्यावा.

– **श्री. भागुराम कदम** (अध्यक्ष)

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# लिडकॉम

भाग ४

### माहिती पुस्तिका


महामंडळाचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयः
बॉम्बे लाईफ बिल्डिंग, ५ वा मजला, ४५ वीर नरिमन रोड, मुंबई–४००००१.
फोनः २२०४७१५७/२२०४४१८६, फॅक्सः (०२२)२२८३५८८१. E-mail: lidcom@vsnl.com


## महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना

### प्रशिक्षणार्थी निवडीच्या अटी :–

१. अर्जदार हा अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाचा असावा.
२. अर्जदाराचे शिक्षण हे देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाकरिता पुरेसे असावे.
३. अर्जदार १८ ते ४० या वयोगटातील असावे.
४. प्रशिक्षण योजनेच्या संदर्भात बेरोजगारांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण योजनेमध्ये कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे दारिद्र्य रेषेखाली असावे.
५. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असला पाहिजे.

### प्रशिक्षणार्थीला अर्जासोबत सादर करावे लागणारी कागदपत्रे

१. जातीचा दाखला २. उत्पन्नाचा दाखला ३. अर्जदार यांचा फोटो ४. रेशन कार्ड किंवा निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र ५. शाळा सोडल्याचा दाखला.

### विद्यावेतन –

मोफत प्रशिक्षणाव्यतिरिक्त प्रशिक्षणार्थीस दरमहा रु. १५०/– ते ३००/– पर्यंत विद्यावेतन देण्यात येते.

### राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (NSFDC), नवी दिल्ली यांच्या योजना :–

महामंडळामार्फत, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (NSFDC), नवी दिल्ली या महामंडळाच्या केन्द्र पुरस्कृत योजनांचा लाभ अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाच्या लाभार्थ्यांना देण्यात येतो. या अंतर्गत चर्मकार समाजाच्या लोकांना त्यांनी निवडलेल्या कोणत्याही स्वयं–रोजगारासाठी खालीलप्रमाणे कर्ज देण्यात येते.

क्रमशः

# आषाढी एकादशी सोहळा



रोहिदास समाज पंचायत संघाच्या वतीने विठ्ठल रखुमाई मंदिर (वरळी) येथे सोमवार दिनांक २३ जुलै २०११ रोजी सकाळी ९ वा. विश्वस्त व शिक्षण समितीचे चिटणीस **श्री. सुरेश जाळगांवकर** व पत्नी **सौ. सुवर्णा जाळगांवकर** यांच्या शुभहस्ते विठ्ठल रखुमाईचा अभिषेक करण्यात आला.

या प्रसंगी सकाळी महिलांचा भजनाचा कार्यक्रम झाला. व रात्री साईलीला लोअर परळ यांच्या भजनाचा कार्यक्रम झाला.

तद्प्रसंगी कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर समाज कल्याण राज्य मंत्री **मा. श्री. सचिनभाऊ अहिर,** नगरसेवक **श्री. सुनिल शिंदे, श्री. जगदीश सावंत, श्री. आशिष चेंबूरकर,** नगरसेविका **सौ. स्नेहल जाधव,** माजी महापौर **मा. श्री. महादेव देवळे,** माजी उपमहापौर **मा. श्री. रमेश मेढेकर** व महामंडळेश्वर **श्री. कृष्णादेवनंदगिरी महाराज** इ. मान्यवर उपस्थित होते. तसेच इतर मान्यवरांच्याही भेटी झाल्या.



शिक्षण समितिचे चिटणीस श्री. सुरेश जाळगांवकर व पत्नी सौ. सुवर्णा सुरेश जाळगांवकर, विठ्ठल रखुमाईचा अभिषेक करताना.

सदरहू उत्सवाला संघाध्यक्ष **श्री. भागुराम कदम,** उपाध्यक्ष **श्री. विजय सावर्डेकर,** सरचिटणीस **श्री. रवी पेवेकर,** चिटणीस **श्री. पंढरी जानवलकर, श्री. गणेश चव्हाण,** कार्यक्रमाचे आयोजक, समाज कल्याण समितीचे अध्यक्ष **श्री. गणेश शिरीसकर,** चिटणीस **श्री. केशव पंदीरकर,** सर्व विश्वस्त व समिती सभासद आवर्जुन उपस्थित होते. रात्री भजनाच्या कार्यक्रमामध्ये सर्व विठ्ठल भक्त भक्ती संगीतात मग्न झाले होते. या वेळी समाज बांधव व इतर भक्तजन मोठया संख्येने उपस्थित होते. शेवटी रात्री १० वा. आरती होऊन आषाढी एकादशीचा कार्यक्रमाची समाप्ती झाली.




संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम हे मा. श्री. सचिनभाऊ अहिर यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करताना, बाजूला समिती अध्यक्ष श्री. गणेश शिरीसकर व सरचिटणीस श्री. रवि पेवेकर दिसत आहेत.



आषाढी कार्तिकी एकादशी निमित्त भजनात तल्लीन झालेले भक्तगण



बेस्टसमितिचे अध्यक्ष श्री. सुनिल शिंदे यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करताना सरचिटणीस श्री. रवि पेवेकर व बाजूला समिती चिटणीस श्री. केशव पंदीरकर दिसत आहेत.

# रौप्य महत्सवी कार्यक्रम

## कांदिवली पूर्व स्थानिक पंचायत, विभाग क्र. १९

## संघाच्या ध्येय धोरणा नुसार वाटचाल करणारी स्थानिक पंचायत

श्री. भागुराम कदम




कांदिवली (पूर्व) स्थानिक पंचायतीच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमात स्मरणिकेचे प्रकाशन करतानाच्या छायाचित्रात डावीकडून संघचिटणीस श्री. गणेश चव्हाण, माजी महापौर श्री. महादेव देवळे, संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम, माजी उपमहापौर श्री. रमेश मेढेकर, माजी संघचिटणीस श्री. प्रदिप केळकर दिसत आहेत.

कांदिवली (पूर्व) स्थानिक पंचायत, सभासद, विद्यार्थी व महिलांसाठी सातत्याने संघाच्या ध्येय धोरणा नुसार वाटचाल करणारी स्थानिक पंचायत आहे. असे गौरवास्पद उद्गार संघाचे अध्यक्ष **श्री. भागुराम कदम** यांनी काढले. ते कांदिवली पूर्व स्थानिक पंचायतीने आयोजित केलेल्या **रौप्य महोत्सव व स्मरणिका प्रकाशन** कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. ते पुढे म्हणाले की, पंचायतीच्या गेल्या २५ वर्षात अनेक कार्यकर्त्यांनी भाग घेवून ही पंचायत वाढविण्याचा प्रयत्न केला. त्या सर्व कार्यकत्यांचा या कार्यक्रमात सत्कार करणार आहात ही आनंदाची बाब आहे. त्याबद्दल त्यांनी पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांचे मनापासून आभार मानले.

मुंबईचे माजी महापौर **श्री. महादेव देवळे** म्हणाले की, आजच्या या कार्यक्रमाला समाज बंधू–भगिनींची उपस्थिती पाहून मला फार आनंद झाला. हीच ताकद रोहिदास समाज पंचायत संघाच्या कामकाजात आपण दाखवावी अशी विनंती केली.

मुंबईचे माजी उपमहापौर **श्री. रमेश मेढेकर** म्हणाले की, विविध प्रकारचे कार्यक्रम राबविणारी स्थानिक पंचायत म्हणजे कांदिली (पूर्व) स्थानिक पंचायत आहे.

विभाग समितीचे अध्यक्ष **श्री. अरविंद पेवेकर** यांनी सुध्दा स्थानिक पंचायतीच्या पदाधिकारी व सभासद यांना रौप्य महोत्सवा निमित्त शुभेच्छा दिल्या.

रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त प्रसिध्द करण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन श्री. भागुराम कदम, श्री. महादेव देवळे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात पंचायत चिटणीस ते संघचिटणीस या पदावर काम करणारे दोन कर्तृवान पदाधिकारी **श्री. प्रदिप केळकर** व **श्री. गणेश चव्हाण** यांचा संघअध्यक्ष श्री. भागुराम कदम व माजी महापौर श्री. महादेव देवळे यांच्या हस्ते स्मृतिचिन्हे देवून विशेष सत्कार करण्यात आला. या शिवाय पंचायतीच्या माजी पदाधिकारी सर्वश्री. सखाराम नांदगावकर, गणेश देवरूखकर, शंकर सावर्डेकर, रमेश पाटणकर, सुर्यकांत पुराडकर, प्रकाश शिर्के, प्रभाकर आंबडसकर, सौ. स्नेहल केळकर, सौ. श्वेता चव्हाण, सौ. ज्योती शिरकर, सौ. शुभांगी खोपकर यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास संघाचे चिटणीस **श्री. पंढरी जानवलकर,** विश्वस्त **श्री. सुभाष कोंडविलकर,** विभागाचे आजी/माजी पदाधिकारी सर्वश्री. शंकर राजापकर, शंकर खेडेकर, सुनिल शिवतरकर, दिनेश मेढेकर, विजय सावर्डेकर, सखाराम आंबेकर इत्यादी मान्यवर अगत्यपूर्वक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कुमारी योगीता गवळी हीने केले. सुत्रसंचालन सौ. ज्योती शिरकर व सौ. शुभांगी खोपकर व आभार प्रदर्शन श्री. सुर्यकांत पुराडकर यांनी केले.

कार्यक्रमास सभासद सहकुटुंब मोठया संखेने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री. अशोक खोपकर, सुनिल कदम, उपेंद्र जळगांवकर, श्याम वायंगणकर, मोहन सावर्डेकर इत्यादीनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमात संत रोहिदास भवनासाठी स्थानिक पंचायतीच्या सभासदांनी रू. ३७,०००/– चे धनादेश संघअध्यक्ष श्री. भागुराम कदम यांच्याकडे सूपूर्द केले.

### गोपिचंद देसाई यांना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर-दलित मित्र पुरस्कार २०१०-११

पान ५ वरून

जळगांव जिल्हयातील भुसावळ तालुक्यातील, बोधवड, मुक्काम–हिंगणे हया बौध्दवस्ती असलेल्या गांवात बुध्दविहार बांधण्यासाठी सहकार्य केले. तसेच अत्यंत गरीब कुटुंबाना दारिद्र रेषेखाली रेशनकार्ड मिळवून देण्यामध्ये पुढाकार घेतल्याने "डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज रत्न पुरस्कार–२००८" देऊन गौरविले.

सन १९९८ साली श्री. आकाशानंद, संचालक दुरदर्शन, मुंबई यांच्या ज्ञानदिप मंडळाने "गुणवंत कार्यकर्ता पुरस्कार–९८" देऊन गौरविले.

श्री. गोपिचंद देसाई हे दक्षिण मुंबई जिल्हा राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे सरचिटणीस व मुंबई प्रदेश मागासवर्गीय सेलचे सरचिटणीस म्हणून कार्यरत आहेत. पक्ष संघटनेची बांधणी व पार्टीचे सर्व उपक्रम राबविण्यात ते पक्षश्रेष्ठी सोबत अग्रेसर असतात. त्यांनी आज पर्यंत केलेल्या राजकीय व सामाजिक कार्याचा विचार करून महाराष्ट्र शासनाने त्यांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार २०१०–११** देऊन त्यांचा विशेष सन्मान केला.

त्यांच्या पुढील यशासाठी रोहिदास समाज पंचायत संघाच्या वतीने **हार्दिक शुभेच्छा!!**

## "हार्दिक अभिनंदन" गोपिचंद देसाई यांना

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर-दलित मित्र पुरस्कार २०१०-११



श्री. गोपिचंद देसाई

विभाग समिती क्र. ५, लोअर परेल, चे **अध्यक्ष मा. श्री. गोपिचंद देसाई** यांना महाराष्ट्र शासनाने **डॉ. बाबासाहेब आंबेडकर–दलित मित्र पुरस्कार** देवून नुकताच गौरव करण्यात आला.

गोपिचंद देसाई हे अत्यंत गरीब कुटुंबात जन्मले. आई–वडील अशिक्षित व गिरणी कामगार अशा प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. १२ वी मध्ये शिकत असतानाच वडीलांचे निधन झाले. म्हणून शिकण्याची इच्छा असताना देखील परिस्थितीमुळे पुढचे शिक्षण न घेता नोकरी करण्याचे त्यानी ठरविले.

भारत बिजली कंपनीमध्ये नुकतीच प्रशिक्षणार्थी नोकरी मिळताच विभागाचे माजी अध्यक्ष कै. के. डी. चिपळूणकर यांच्या आग्रहाखातीर स्थानिक पंचायतीचा चिटणीस म्हणून १८ वर्षे पूर्ण होण्याआधी वडीलांच्या जागी पंचायतीचा सभासद होऊन समाजकार्याला सुरुवात झाली. सन १९८२ ते १९८५ सालाकरीता संघ विश्वस्त म्हणून निवडून आल्यावर युवक कल्याण व व्यवसाय मार्गदर्शन समितीचे चिटणीस म्हणून यशस्वीरीत्या काम केले.

आदित्य सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाचे अध्यक्षपद, सी. एस्. आर. असोसिएशन या कुष्ठरोग्यांसाठी काम करणाऱ्या संस्थेचे अध्यक्षपद व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा तालुका उपाध्यक्ष अशी पदे भुषवित कार्य करीत असल्याने महाराष्ट्र शासनाने सन १९८६ साली "विशेष कार्यकारी दंडाधिकारी" (S.E.M.) म्हणून नियुक्ती केली. तेव्हा पासून आजमिती पर्यंत सतत एस्. ई. एम्., एस्. ई. ओ. अशी कधीही खंड न पडता नियुक्ती झालेली असुन आता कायम स्वरूपी एस्. ई. ओ. म्हणून नियुक्ती झालेली आहे.

मोतीराम दयाराम चाळ स्थानिक पंचायतीचे गेली २१ वर्षे अध्यक्ष, सनमिल रोड विभाग क्र. ५ चे गेली १५ वर्षे अध्यक्ष व सन १९८२ ते आजमिती पर्यंत स्थानिक पंचायतीचे अध्यक्ष व मध्यवर्ती कार्यकारणीचा प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहे. तसेच समाजाचा ६ वा सांस्कृतिक क्रिडा महोत्सव यशस्वी रित्या पार पाडण्यामध्ये सदर समितीचा चिटणीस या नात्याने जबाबदारी पार पाडली.

भारत बिजली कंपनीत नोकरी करीत असताना कामाचे कौशल्य, तेथे इतरांसाठी करीत असलेले शैक्षणिक, सामाजिक कार्य याचे मुल्यमापन करून महाराष्ट्र शासनाने "गुणवंत कामगार पुरस्कार–२०००" दिला.

धुळे जिल्हयात शिरपुर तालुका हया आदिवाशी भागात शिकत असलेल्या गरीब मुलींना शाळेशेजारी राहण्यासाठी मोफत वसतीगृह बांधून देण्यासाठी केलेल्या बहुमुल्य सहकार्याबद्दल व शाळेला शैक्षणिक कार्यामध्ये केलेल्या मदतीचा सारासर विचार करून त्यांनी सन २००५ साली "महात्मा फुले सन्मान पुरस्कार" देऊन गौरव केला.

पान ४ वर

## "भावपूर्ण श्रदांजली"



**कै. यशवंत बाळू जानवलकर**

महात्मा गांधी स्मृती वसाहत स्थानिक पंचायतीचे माजी चिटणीस व समाजाचे सक्रीय कार्यकर्ते कै. श्री. यशवंत बाळू जानवलकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक १ ऑगस्ट २०११ रोजी वयाच्या ६१ व्या वर्षी निधन झाले.

श्री. यशवंत बाळू जानवलकर यांनी चिटणीस पदाची धूरा सांभाळताना पंचायच्या वतीने अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. व त्या कार्यक्रमांना सरकार मधील मंत्र्यांना पाहुणे बोलवून स्थानिक पंचायतीच्या माध्यमातून समाजाची ओळख करून दिली आहे.

ते विभाग समिती क्र. ११ मध्ये सुध्दा क्रियाशील होते. त्यांच्या निधनाने समाज एका सच्चा कार्यकत्याला मुकला आहे.

पान १ वरून

## विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास वाढवला पाहिजे

की, शिका, संघटीत व्हा आणि समाजासाठी उपयोगी व्हा.

त्यांनी रोहिदास भवन निधी संबंधीत सविस्तर माहीती दिली. निधी जमा करणे म्हणजे काही जादूची कांडी नाही, की ती फिरविली की लाखो रूपये जमा होतील. या करिता प्रत्येक बांधवांनी आर्थिक मदत केली पाहिजे.

शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. संजीव दाभोळकर यांनी प्रास्तावीक भाषण केले.

या वेळी इ. ७ वी ते पदव्युत्तर विद्यार्थांना पारितोषिके व शिष्यवृत्ती पाहूण्यांच्या हस्ते देण्यात आले. इ. १० वी व १२ वीत प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरलेल्या विद्यार्थांच्या पालकांचा सत्कार, सोहळयाचे प्रमुख अतिथी डॉ. छाया शिंदे, श्री. प्रकाश सावंत व संघाध्यक्ष श्री. भागुराम कदम, उपाध्यक्ष श्री. विजय सावर्डेकर, कोषाध्यक्ष श्री. प्रीतम पेवेकर, चिटणीस व श्री. गणेश चव्हाण, समिती अध्यक्ष श्री. संजीव दाभोळकर यांच्या हस्ते इतर विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला.

सोहळयाचे आभार प्रदर्शन समिती चिटणीस श्री. सुरेश जाळगांवकर यांनी केले. सोहळा यशस्वी रितीने पार पाडण्यात समिती सदस्य श्री. शांताराम देवळेकर, श्री. हिरामण वायंगणकर व श्री. जगदिश जळगावकर, इत्यादीचे सहकार्य लाभले.

सोहळयाचे सूत्रसंचालन संघ सरचिटणीस श्री. रवि पेवेकर यांनी आपल्या कौशल्याने केले. शेवटी राष्ट्रगीताने सोहळयाची सांगता झाली.

# संत रोहिदास भवन निधी देणगीदार

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| १७२५ | श्री. सदानंद गोपाळ शिर्के<br>कै. कृष्णाबाई गोपाळ शिर्के<br>(आई) यांच्या स्मरणार्थ | २,०००/– |
| १७२६ | श्री. प्रताप शामराव जळगांवकर<br>कै. शामराव गोविंद जळगांवकर(वडिल)<br>कै. सरस्वती शामराव जळगांवकर<br>(आई) यांच्या स्मरणार्थ | २,०००/– |
| १६७२ | श्री. वसंत हिरू सावर्डेकर<br>कै. हिरू बाबू सावर्डेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,१११/– |
| १६६३ | श्री. सिताराम देवजी कदम<br>कै. देवजी दाजी कदम यांच्या स्मरणार्थ | १,१११/– |
| १६७७ | श्री. सुधीर पांडुरंग मुरूडकर<br>कै. पांडुरंग रामा मुरूडकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,१११/– |
| १६६५ | श्री. लक्ष्मण सखाराम पावसकर | १,१११/– |
| १६७९ | श्री. रविंद्र विठ्ठल कोलबेकर<br>कै. डॉ. दादासाहेब कोलबेकर (पाटील)<br>यांच्या स्मरणार्थ | १,००८/– |
| १६५१ | श्री. गणेश महादेव चिपळूणकर | १,००१/– |
| १६५४ | श्री. जनार्दन सखाराम सावर्डेकर | १,००१/– |
| १६५८ | श्री. रोहन दिपक धामणकर | १,००१/– |
| १६५९ | श्री. मारूती विठ्ठल देवळेकर | १,००१/– |
| १६७६ | श्री. बाबुराव दा. कोंडविलकर<br>कै. सौ. अनुसया बाबुराव कोंडविलकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| १६६६ | श्री. बाळकृष्ण दाजी चव्हाण<br>कै. दाजी चव्हाण, यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| १६६७ | श्री. अनिल गोपाळ केळशीकर<br>कै. गोपाळ नारायण केळशीकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| १७०० | श्री. बाळाराम धोंडू केळशीकर | १,००१/– |
| १६८२ | श्री. धर्मेंद्र तुकाराम म्हाप्रोळकर<br>कै. तुकाराम गोविंद म्हाप्रोळकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| १६७८ | श्री. संतोष पंजाबराव गव्हाळे | १,००१/– |

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| १७०२ | श्री. संदिप संभाजी देवरूखकर<br>कै. यशवंत संभाजी देवरूखकर<br>(आजोबा) यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| १७०३ | श्री. संदिप अशोक नागांवकर<br>कै. सौ. कमला अशोक नागांवकर<br>(आई) यांच्या स्मरणार्थ | १,००१/– |
| १६५२ | श्री. सुर्यकांत रामचंद्र पेवेकर<br>कै. रामचंद्र गोविंद पेवेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६५३ | श्री. अंकूश बंडू मेढेकर | १,०००/– |
| १६५५ | श्री. शिवदास यशवंत समजिसकर<br>कै. यशवंत शिवा समजिसकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६५६ | श्री. सुरेश गणपत जालगांवकर<br>कै. ग.भा. नर्मदाबाई सोनू जालगांवकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६६० | श्री. विनायक शंकर आंबोकर | १,०००/– |
| १६६१ | श्री. प्रकाश गजानन चिपळूणकर<br>कै. गजानन रामा चिपळूणकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६६२ | श्री. सुभाष लक्ष्मण देवरूखकर<br>कै. लक्ष्मण भाऊ देवरूखकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६६४ | श्री. दत्ताराम महादेव निरूळकर | १,०००/– |
| १६६८ | श्री. गजानन न. पालवणकर | १,०००/– |
| १६६९ | श्री. राजेन्द्रकुमार रा. नेवरेकर | १,०००/– |
| १६९७ | श्री. भिकाजी विठ्ठल कदम | १,०००/– |
| १६७० | श्री. संदिप रमेश घानकुटकर<br>कै. रमेश विठोबा घानकुटकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६७१ | श्री. रविंद्र गुणाजी सावर्डेकर<br>कै. गुणाजी बाबाजी सावर्डेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६७४ | श्री. सुरेश हरी लांजेकर<br>कै. नारायण सुडकोजी खेडेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |

# संत रोहिदास भवन निधी देणगीदार

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| १६७५ | श्री. आत्माराम भिकूराम शिरीसकर<br>कै. सौ. अलका आत्माराम शिरीसकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६८० | श्री. दिपक सिताराम चव्हाण<br>कै. सिताराम महादेव चव्हाण<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६८१ | श्री. सुनिल सोनू सावर्डेकर<br>कै. सोनू गणपत सावर्डेकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६५७ | श्री. परशुराम गंगाराम वायंगणकर | १,०००/– |
| १६८३ | श्री. सदानंद गोविंद काजरोळर | १,०००/– |
| १६८४ | श्री. आदेश सिताराम जानवलेकर | १,०००/– |
| १६८५ | श्री. रामचंद्र बाबाजी जाधव<br>कै. गोपीचंद बाबाजी जाधव<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६८६ | श्री. रघुनाथ गणपत पालशेतकर | १,०००/– |
| १६८७ | श्री. सुभाष शंकर धयालकर | १,०००/– |
| १६८८ | श्री. यादवेंद्र विठ्ठल पेवेकर | १,०००/– |
| १६८९ | श्री. दिनेश प्रभाकर मोरे<br>कै. चंदा प्रभाकर मोरे (मातोश्री)<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६९० | श्री. विलास गणपत खेडेकर | १,०००/– |
| १६९१ | श्री. हरिश्चंद्र रामा मुरूडकर | १,०००/– |
| १६९२ | श्री. अमोल राजेन्द्र साबळे<br>कै. राजेन्द्रकुमार महादेव साबळे<br>(वडील) यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६९३ | श्री. दत्ताराम लक्ष्मण केळकर | १,०००/– |
| १६९५ | श्री. शांताराम मोतीराम नारकर<br>कै. मोतीराम गणू नारकर व<br>कै. भागिर्थी मोतीराम नारकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६९६ | श्री. दत्तात्रय रामचंद्र गिमोणकर<br>कै. रामचंद्र सखाराम गिमोणकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १६९८ | श्री. राकेश रमेश दाभोळकर | १,०००/– |
| १६९९ | श्री. मनोज भिकूराम आंगळेकर | १,०००/– |

| अ.क्र. | देणगीदार | रक्कम |
|---|---|---|
| १७०१ | श्री. मधुकर काशिराम चिपळूणकर | १,०००/– |
| १७०४ | श्री. बळीराम सिताराम विनेरकर | १,०००/– |
| १७०५ | श्री. दिग्वीजय काशिनाथ चव्हाण<br>कै. काशिनाथ गगांराम चव्हाण<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १७०६ | श्री. मोहन सावळाराम चव्हाण | १,०००/– |
| १७०७ | श्री. किरण विजय मासवकर | १,०००/– |
| १७०८ | श्री. संजय विठ्ठल चिखलकर | १,०००/– |
| १७०९ | श्री. रविंद्र महादेव चिपळूणकर | १,०००/– |
| १७१० | श्री. धनंजय शांताराम चिपळूणकर | १,०००/– |
| १७११ | श्री. चेतन चव्हाण | १,०००/– |
| १७१२ | श्री. राजाराम शंकर दाभोळकर | १,०००/– |
| १७१३ | श्री. वसंत रत्नू पेवेकर | १,०००/– |
| १७१४ | श्री. रूपेश हरिश्चंद्र जाळगावकर<br>कै. हरिश्चंद्र लक्ष्मण जाळगावकर<br>(वडील) यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १७१५ | श्री. अरूण कृष्णा चिपळूणकर | १,०००/– |
| १७१६ | श्री. कैलाश पांडूरंग मुरूडकर | १,०००/– |
| १७१७ | श्री. दत्ताराम गोविंद मेढेकर | १,०००/– |
| १७१८ | श्री. दत्ताराम धाकटू सावर्डेकर | १,०००/– |
| १७१९ | श्री. संदिप यशवंत चिपळूणकर<br>कै. यशवंत गंगाराम चिपळूणकर<br>यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १७२० | श्री. नारायण विठ्ठल पारकर<br>कै. रूक्मिणी विठ्ठल पारकर<br>(आई) यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १७२१ | श्री. दगडू वामन शिवतरकर | १,०००/– |
| १७२२ | श्री. दिपक वसंत कोंडविलकर<br>कै. वसंत जानू कोंडविलकर<br>(वडील) यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १७२३ | श्री. रामचंद्र कृष्णा पवार | १,०००/– |
| १७२४ | श्री. मंदा संतोष पवार<br>कै. संतोष रामचंद्र पवार<br>(पती) यांच्या स्मरणार्थ | १,०००/– |
| १७२७ | श्री. सुरेश जयराम ढवळे | १,०००/– |
| | | (क्रमशः) |

# अभिनंदन !!!



**नगरसेवक श्री. मनोज जामसुतकर**

प्रभाग क्र. २०८



**नगरसेविका सौ. स्नेहल सुर्यकांत आंबेकर**

प्रभाग क्र. १९४



**नगरसेवक श्री. सुधीर जाधव**

प्रभाग क्र. १८४

रोहिदास समाज पंचायत संघाच्या वतीने वरील विजयी नगरसेवकांचे

## !! हार्दिक अभिनंदन !!